# वाचकांच्या गरजा पाहून पत्रकारिता करावी

## सम्राट फडणीस; सोलापूर येथे पत्रकारदिनानिमित्त कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**



सम्राट फडणीस

कोल्हापूर, ता. ६ : 'कोविडच्या काळात माध्यमांची हानी झाली, मुद्रित माध्यमांनी याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. त्याच्या गरजा काय, हे लक्षात घेऊन पत्रकारिता केली पाहिजे, असे केलेच तरच मुद्रित माध्यमांची पत्रकारिता यापुढे टिकेल,' असे प्रतिपादन 'सकाळ'च्या पुणे आवृत्तीचे संपादक सम्राट फडणीस यांनी केले.

कोल्हापूर, नांदेड, जळगाव आणि सोलापूर विद्यापीठातील पत्रकारिता व जनसंवाद विभागातर्फे पत्रकार दिनानिमित्त झालेल्या ऑनलाईन राज्यस्तरीय कार्यशाळेत ते बोलत होते.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. डॉ. मृणालिनी फडणवीस अध्यक्षस्थानी होत्या.

सुरवातीला डॉ. फडणवीस यांनी 'मुद्रित माध्यमांसमोरील आव्हाने' या विषयावर विवेचन केले. त्या म्हणाल्या, ''कोविडच्या काळात कधी नव्हे इतकी माध्यमांची हानी झाली. याचा सर्वच मुद्रित माध्यमांनी गांभीर्याने विचार करावा.

मुद्रित माध्यमांचा वाचक काय विचार करतो, हे समजून घेण्यात माध्यमे कमी पडली. दहा वर्षांपासून ही प्रक्रिया सुरू आहे. वाचकांच्या आकांक्षा पूर्ण करण्यात मुद्रित माध्यमे तोकडी पडल्याने वाचकांनी अन्य पर्यायांचा स्वीकार केला.''

माहिती व जनसंपर्क महासंचलनालयाचे संचालक अजय आंबेकर म्हणाले, ''मुद्रित माध्यमांना गौरवशाली परंपरा असली तर नवमाध्यमांनी त्यांच्यासमोर मोठे आव्हान उभे केले आहे. माध्यमांकडून लोकांकडे निर्णय प्रक्रिया सरकली आहे. नजीकच्या काळात नवमाध्यमे महत्त्वाची भूमिका बजावतील.'' यावेळी प्रा. डॉ. गौतम कांबळे, शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या प्रमुख डॉ. निशा पवार, डॉ. सुधीर भटकर, प्रा. डॉ. दीपक शिंदे आदी उपस्थित होते.

# मुद्रित माध्यमांनी आत्मपरीक्षण करावे

## राज्यस्तरीय चर्चासत्रात अजय आंबेकर यांचे मत : राज्यातील चार पत्रकारिता विभागांचा संयुक्त कार्यक्रम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

माध्यमे वेगाने बदलत आहेत. मुद्रित माध्यमांनी बदलत्या काळाची गरज ओळखून आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे, असे मत राज्याच्या माहिती व जनसंपर्क महासंचलनालयाचे संचालक अजय आंबेकर यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, नांदेड, जळगाव आणि सोलापूर विद्यापीठांतील पत्रकारिता व जनसंवाद विभागांच्या संयुक्त विद्यमाने पत्रकार दिनानिमित्त आयोजित ऑनलाईन राज्यस्तरीय कार्यशाळेत ते बोलत होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मृणालिणी फडणवीस अध्यक्षस्थानी होत्या.

ज्येष्ठ पत्रकार सम्राट फडणीस यांनी 'मुद्रित माध्यमांसमोरील आव्हाने' या विषयावर विवेचन केले. ते म्हणाले, कोविडच्या काळात कधी नव्हे इतकी माध्यमांची हानी झाली. याचा सर्वच मुद्रित माध्यमांनी गांभीर्याने विचार करायला हवा. मुद्रित माध्यमांचा वाचक काय विचार करतो हे समजून घेण्यात माध्यमे कमी पडली. गेल्या दहा वर्षांपासून ही प्रक्रिया सुरू आहे. वाचकांच्या आकांक्षा पूर्ण करण्यात मुद्रित माध्यमे तोकडी पडल्याने वाचकांनी अन्य पर्यायांचा स्वीकार केला.



> मुद्रित माध्यमांना मोठी गौरवशाली परंपरा आहे; मात्र नवमाध्यमांनी त्यांच्यासमोर मोठे आव्हान उभे केले आहे. माध्यमांकडून लोकांकडे निर्णय प्रक्रिया सरकली आहे. पारंपरिक माध्यमे यापूर्वी द्वारपालाची भूमिका बजावत होती.
> **- अजय आंबेकर**, संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचलनालय

वाचकांना गृहीत धरून उपयोगाचे नाही, तर त्यांच्या गरजा विचारात घेऊन केलेली पत्रकारिताच यापुढे टिकेल.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. फडणवीस म्हणाल्या, माध्यमांकडून समाजाच्या खूप अपेक्षा असतात. प्रत्येकाची अपेक्षा पूर्ण करणे शक्य नसले तरी माध्यमांनी सकारात्मक पत्रकारितेवर भर द्यावा. यातून चांगला समाज निर्माण होण्यास मदत होईल.

सोलापूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. देवेंद्रनाथ मिश्रा यांनी स्वागत केले. विभागप्रमुख डॉ. रवींद्र चिंचोलकर यांनी प्रास्ताविक केले. यावेळी सोलापूर विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्र संकुलाचे संचालक प्रा. डॉ. गौतम कांबळे, शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या प्रमुख डॉ. निशा पवार, जळगावच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागाचे प्रमुख डॉ. सुधीर भटकर, नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या स्कूल ऑफ मीडिया स्टडीजचे संचालक प्रा. डॉ. दीपक शिंदे यांच्यासह पत्रकारितेचे शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन तेजस्विनी कांबळे यांनी केले. डॉ. आंबादास भासके यांनी आभार मानले.

शिवाजी विद्यापीठ : पुनर्प्रवेश परीक्षा मंगळवारी

# १४ पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या २२६ जागा रिक्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विविध १५ पदव्युत्तर अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाली आहे. बी.लिब., एम.लिब., बी.जे., एम.जे., आदी १४ अभ्यासक्रमांच्या २२६ जागा रिक्त असून, त्यासाठी मंगळवारी (दि. १२) पुनर्प्रवेश परीक्षा होणार आहे. एम. ए., एम. कॉम., अभ्यासक्रमाच्या प्रवेशाची अंतिम गुणवत्ता यादी सोमवारी (दि. ११) जाहीर होणार आहे.

विद्यापीठाच्या पदव्युत्तर प्रवेश विभागाने विविध अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया दि. ७ डिसेंबरपासून सुरू केली. मात्र, एसईबीसी आरक्षणाच्या मुद्यावर काही मराठा समाजातील संघटनांनी दि. १० डिसेंबरपर्यंत प्रवेश प्रक्रिया स्थगित करण्याची मागणी केली. त्यानंतर विद्यापीठाने १४ डिसेंबरपासून प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली. आतापर्यंत अॅग्रो केमिकल अँड पेस्ट मॅनेजमेंट, बायोटेक्नॉलॉजी, वनस्पतीशास्त्र, रसायनशास्त्र, संगणकशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, पर्यावरणशास्त्र, फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी, गणित, मायक्रोबायोलॉजी, भौतिकशास्त्र, संख्याशास्त्र, प्राणीशास्त्र, बायोकेमिस्ट्री, एलएलएम या अभ्यासक्रमांच्या एकूण १०२७ जागांची प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाली आहे. वायसीआरडी अभ्यासक्रम (एमआरएस., एमबीए., एमटेक., एमएसडब्ल्यू), बी.लिब., एम.लिब., बी.जे., एम. जे., एम.ए. मास कम्युनिकेशन, बी.एस्सी- एम.एस्सी. नॅनो सायन्स., संगणकशास्त्र, एम.एस्सी. मेडिकल इनफॉर्मेशन मॅनेजमेंट या अभ्यासक्रमांच्या २३२ जागांवर प्रवेश निश्चित झाले असून, २२६ जागा अद्याप रिक्त आहेत. त्यावरील प्रवेशासाठी मंगळवारी सकाळी दहा ते सायंकाळी साडेपाच यावेळेत ऑफलाईन पद्धतीने प्रवेश परीक्षा होणार आहे. एम.ए.च्या विविध नऊ अभ्यासक्रम आणि एम. कॉम. अभ्यासक्रमाची ४९५ इतकी प्रवेश क्षमता आहे. त्याची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे.

> विद्यापीठातील बहुतांश विभागांतील प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाली आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर ज्या विभागांमधील जागा रिक्त आहेत. त्यांची प्रवेश प्रक्रिया सध्या सुरु आहे. ती पूर्ण झाल्यानंतर या अभ्यासक्रमांचे वर्ग हे शासन आदेशानुसार सुरु केले जातील.
>
> - डॉ. पी. एस. पाटील, प्र-कुलगुरु



## जानेवारीअखेर प्रक्रिया पूर्ण

- रिक्त जागांवरील आणि एम.ए., एम.कॉम. या सर्व अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया जानेवारीअखेरपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आम्ही केले आहे.
- या प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर केले असल्याची माहिती पदव्युत्तर प्रवेश विभागाचे उपकुलसचिव डॉ. पी. एस. पांडव यांनी दिली.